# उल्हास कशाळकर

“कलाकारांचे कलाकार” म्हणून ज्यांना आपण ओळखतो असे उल्हास कशाळकर ह्याचा जन्म महाराष्ट्रात ल्या पांढरकवडा ह्या गावी एका सांगितिक परिवारात झाला.
त्यांचे वडील हे पेशाने वकील असून एक नामवंत संगीतज्ञ होते. सुरूवातीचं शिक्षण घरातंच मिळालं. पुढे नागपूरला उच्च शिक्षणासाठी रहात असताना राजाभाऊ कोगजे आणि प्रभाकर राव खर्डेनविसांच मार्गदर्शन मिळालं.
संगीत विषयात पदव्युत्तर शिक्षणात सुवर्णपदक प्राप्त केल्यानंतर घरंदाज गायकी च्या पुढील शिक्षणासाठी उल्हासजींनी पं.गजानन बुवा जोशीं आणि पं.राम मराठ्यांचे शिष्यत्व पत्करले.
ग्वालियर , जयपूर आणि आग्रा या तीन घराण्यांची विधीवत तालीम उल्हासजींना इथे मिळाली.त्यानंतर आकाशवाणी मधे काही वर्ष कार्यक्रम अधिकारी म्हणून विविध केंद्रांवर त्यांनी काम केलंय.

१९९२ पासून उल्हासजी कलकत्याच्या ITC संगीत रीसर्च अकेडमी मधे गुरू म्हणून कार्यरत आहेत. उल्हासजींचे शिष्य आज देश विदेशात सर्वश्रुत आहेत आणि संगीताची परंपरा पुढे चालवित आहेत.

उल्हासजींना अनेक सन्मान प्राप्त झाले आहेत. त्यापैकी प्रमुख म्हणजे संगीत नाटक अकेडेमी अवॉर्ड, महाराष्ट्र सरकारचा प. भीमसेन जोशी जीवन गौरव पुरस्कार,
मध्यप्रदेश सरकारचा तानसेन पुरस्कार ,गुजरात संगीत नाटक अकेडेमी पुरस्कार ,आणि भारत सरकार चा पद्मश्री पुरस्कार .
याशिवाय स्वर-रत्न,राग ऋषी,आणि जगत् गुरू शंकराचार्यां कडून गानतपस्वी ही उपाधी आणि सन्मान त्यांना बहाल करण्यात आला आहे.

उल्हासजींच्या गाण्याचं वैशिष्ट्य सांगायचे तर परंपरेतून निर्माण झालेली नवता असं करता येईल.